MHND100003702026

## निशाणी क्र.१ खाली आदेश
(दिनांक ०४ माहे मे, सन २०२६ रोजी पारीत)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय वारसा कायदा, १८७२ चे कलम ३७२ प्रमाणे उत्तराधिकार (सक्सेशन सर्टीफिकेट) प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील व्यंकटी दत्ता मुळके हे दिनांक ०८.०३.२०२३ रोजी मयत झाले आहेत. मयत व्यंकटी दत्ता मुळके यांची नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड, शाखा कुरूळा, ता. कंधार, जि. नांदेड येथे रक्कम जमा असून त्यांचा खाते क्र. १०४४१११११११४६०८ या खात्यामध्ये मयताच्या नावे रक्कम रुपये ५४,०००/-(चौपन्न हजार रूपये) जमा आहेत.

३. गैरअर्जदारावर न्यायलयाची नोटीसची बजावणी होवून देखील ते न्यायालयात हजर झाले नाहीत, त्यामुळे त्यांच्याविरूद्ध एकतर्फा आदेश करण्यात आला. अर्जदार हे नमूद रक्कम मिळणेसाठी अर्जदारांना वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, म्हणून अर्जदारांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात सादर केलेला आहे. मयत व्यंकटी दत्ता मुळके यांचे अर्जदार क्र.१ व २ हे मुले असे वारस असल्याने वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत.

४. अर्जदारांनी त्यांच्या कथनाचे समर्थनार्थ मयत व्यंकटी दत्ता मुळके यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत (निशाणी क्र.१३), वारस प्रमाणपत्र(निशाणी क्र.१४), मयत व्यंकटी दत्ता मुळके यांचे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड, शाखा कुरूळा येथील खात्याच्या पासबुकचे पहिल्या पानाची पडताळणी केलेली प्रत (निशाणी क्र.१५), अर्जदारांच्या पडताळणी केलेल्या आधारकार्डच्या प्रती (निशाणी क्रं.१६ व १७), दि.२९.०३.२०२६ रोजीच्या 'दैनिक वतनवाला' वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहीर नोटीसची मुळ प्रत (निशाणी क्रं. १८) इत्यादी अभिलेखावर दाखल केलेले आहेत.

५.	अर्जदार क्र.२ तानाजी पि. व्यंकटी मुळके यांनी पुरावा शपथपत्र निशाणी क्रं. १२ अभिलेखावर दाखल केले असून त्यांचा पुरावा अबाधित आहे. सदर प्रकरणामध्ये 'दैनिक वतनवाला' या स्थानिक परिसरात प्रकाशीत होणा-या वर्तमानपत्रामध्ये जाहीर आक्षेपांची वाट पाहिली परंतु कोणताही आक्षेप आला नाही. गैरअर्जदारांनी त्यांचे उत्तर अभिलेखावर दाखल केले नसल्यामुळे अर्जदारांचे कथन बँकेतील रक्कमेबाबत अबाधित राहिले आहे. सबब अर्जदार उत्तराधिकार (सक्सेशन सर्टीफिकेट) प्रमाणपत्र मिळण्यास हिंदु वारसा कायदयाचे प्रमाणे पात्र आहेत. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्र.१ शिवाजी पि. व्यंकटी मुळके व अर्जदार क्र.२ तानाजी पि. व्यंकटी मुळके हे मयत व्यंकटी दत्ता मुळके यांचे वारस आहेत. |
| ३. | अर्जदारांनी आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर उत्तराधिकार (सक्सेशन सर्टीफिकेट) प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे. |

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.05.04 16:00:37 +0530

(के. एस. खंडारे)
सह दिवाणी न्यायाधीश
(क.स्तर), कंधार

दि.०४.०५.२०२६

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file judgment/order are same word to word, as per the original Judgment/order.

Name of the Stenographer :- Mrs J P Ghogare

Court Name :- In the Court of Jt. C.J.J.D, Kandhar

Date of the judgment/order :- 04.05.2026

Judgment/order signed by the presiding officer on :- 04.05.2026

Judgment/order uploaded on :- 04.05.2026